ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | श्रीमोहिनीराज-दर्शन |
| लेखक | : | नरहर मुरलीधर बडवे, वैद्य |
| प्रकाशक | : | नरहर मुरलीधर बडवे, वैद्य नेवासें |
| प्रकाशन वर्ष | : | १९४१ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर – २०२४

# श्रीमोहिनीराज-दर्शन

लेखक व प्रकाशक

नरहर मुरलीधर बडवे, वैद्य

नेवासें

मुद्रक

म. भा. काळे

प्रतिभा प्रेस, ३३५ शनिवार, पुणें २.

आवृत्ति पहिली

१९४१

किंमत आठ आणे.

ज्यांच्या
प्रेमळ छत्राखालीं बसून
ही कृति घडली
त्या
पित्याचे चरणीं

अर्पण

# अनुक्रमणिका

—❋✷❋—

निवेदन– (लेखकाचें हृद्गत) पुरस्कार, ओळख इ.

## भाग १ ला— पौराणिक माहिती

| | | |
|---|---|---|
| १ | समुद्र–मंथनाचें कारण | १ |
| २ | समुद्रमंथन | ३ |
| ३ | मोहिनीअवतार | ८ |
| ४ | महालया क्षेत्र | १३ |
| ५ | मोहिनीस्तव, आरती, ध्यान इ. व मुख्य मूर्तीचा फोटो | १६ |

## भाग २ रा— ऐतिहासिक माहिती

| | | |
|---|---|---|
| १ | जुनें मंदीर | २१ |
| २ | तेराव्या शतकांतील नेवासें | २५ |
| ३ | नवें मंदीर | ३१ |
| ४ | देवस्थानची व्यवस्था | ३६ |
| ५ | परिशिष्टें | ३९ |
| | (ॐ) सरदार चंद्रचूड | ३९ |
| | (श्री) देवस्थानच्या नक्त नेमणुका | ४१ |
| | (मो) देवस्थानची इस्टेट | ४३ |
| | (हि) ज्ञानोबाचा खांब | ४४ |
| | (नी) प्रवरासंगम टोकें | ४६ |
| | (रा) नेवासें, वेरूळ व पैठण | ४८ |
| | (ज) बडवे यांच्या सनदा | ४९ |


———

# निवेदन [ गाभाऱ्यांतून ]

नेवासें येथील श्रीमोहिनीराज देव हे मोगलाई, मराठवाडा, वऱ्हाड, खानदेश इ. महाराष्ट्रांतील बऱ्याच भागांतील लोकांचें कुलदैवत आहे. त्यामुळें त्या भागांतील लोक आपले कुलधर्म कुलाचार ( ओहर, जावळ, मौंज, विवाह इ. ) करण्याकरितां व नवस फेडण्याकरितां येत असतात. मोहिनी अवताराची माहिती श्रीमान् भागवतांत आहे. परंतु तो ग्रंथ मोठा, किंमतवान व संस्कृत असल्यामुळें समजण्यास कठीण, यामुळें सामान्य जनतेस दुर्लभ; मोहिनीराजाचें स्तुति स्तोत्र हें महालया महात्म्य, प्रवरा महात्म्य ह्या ग्रंथांत आहे. परंतु तें हस्तलिखित व संस्कृत अतएव दुर्मिळ ! यामुळें त्या देवस्थानची माहिती सामान्य जनतेस मिळूं शकत नाहीं. परंतु आपल्या कुलदेवतेची माहिती आपणांस मिळावी म्हणून येथें येणारे लोक मजजवळ आपली उत्कट इच्छा प्रदर्शित करितात. परंतु मराठींत असें एकही पुस्तक उपलब्ध नसल्यामुळें मला त्यांची आशा पूर्ण करतां येईना.

असें असलें तरी भक्तांची होणारी ती निराशा पाहून मलाही दुःख होई. म्हणून जनतेकरतां म्हणा किंवा स्वतःचे समाधानाकरतां म्हणा अशा तऱ्हेचें पुस्तक तयार करावें असें माझे मनांत बरेच दिवसापासून घोळत होतें. तथापि श्री व सरस्वति या दोघींचा वरदहस्त मजवर बेताचाच असल्यामुळें ही गोष्ट म्हणजे मज-सारख्यास धाडसच होय. पण प्रयत्नान्ति परमेश्वर या म्हणीप्रमाणें थोडें थोडें वाचन करून लिखाणास

सुरवात केली व हें छोटेसें पुस्तक तयार केलें आहे.

माझे मित्र रं. म. जोशी मास्तर उर्फ कवि निर्मळ यांनीं या कामीं फार मदत केली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणें भा. इ. सं. मंडळाचे सदस्य प्रो. पोतदार, जोशी, खरे या मंडळींनीं त्यांचा माझा पूर्व परिचय नसतांनाही मला जरूर ती माहिती देऊन जी बहुमोल मदत दिली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्याचप्रमाणें प्रतिभा प्रेसच्या व्यवस्थापकांनीं जी मदत केली तीबद्दलही मी त्यांचा ऋणी आहे.

या पुस्तकाचे बाबतींत मला पुष्कळ लहान थोर व्यक्तींनीं साह्य केलें, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. स्थलाभावामुळें सर्वांचा उल्लेख करतां येत नाहीं, याबद्दल त्यांनीं राग मानूं नये.

आधार ग्रंथः--ही माहिती मी खालील ग्रंथांतून मिळविली आहे.

श्रीमान् भागवत ( संस्कृत ), श्रीमहालया महात्म्य व प्रवरा महात्म्य ( संस्कृत हस्तलिखित ), इन्डियन अँटिकेरी, बॉम्बेगॅझिटियर ( इंग्रजी ).

शेवटीं ही अल्पशी सेवा माझे हातून घेतल्याबद्दल त्या दयाघन प्रभू मोहिनीराजांस वंदन करून वाचकांना त्यांचें शब्दरूपी दर्शन घेण्यास मोकळें करतों.

मकरसंक्रांत<br>
पौष शु. १५ शके १८६२<br>
ता. १३।१।४१<br>
निधिनिवास

लेखक<br>
न. मु. बडवे

# पुरस्कार

नेवासें हें महाराष्ट्रांतील यादव राजांचें केंद्र होतें, आणि महाराष्ट्रसंताग्रणी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ज्ञानेश्वरीहि येथेंच प्रगट झाली; त्यामुळें या स्थळाच्या महिमेंत चिरस्मरणीय भर पडली. येथील म्हाळसा-मोहिनीराजाच्या मंदिरामुळें हें क्षेत्र तर होतेंच. शेजारी कायगांव-टोकें आणि पैठण हीं प्रसिद्ध ठिकाणें. आज तेंच नेवासें उजाड झालें आहे. सर्वत्र यादव-कालीन अवशेष विखुरलेले दृष्टीस पडतात. येथील देशपांडे, कुलकर्णी, देशमुख, बडवे वगैरे घराण्यांत प्राचीन कागद-पत्रें, पोथ्या पुष्कळच मिळतील. कांहीं कागद मिळवून प्रसिद्धहि केले आहेत. त्यांवरून चांदबिबीच्या वेळेपासूनचे दाखले आढळतात. श्री. शहाजीराजे यांच्या हुकुमावरून श्रीम्हाळ-सादेवीला पूजा नैवेद्यासाठीं इनाम व देणगी मिळाल्याचेहि कागद प्रसिद्ध आहेत. शिवभारतकर्ता प्रसिद्ध परमानंद कवींद्र हा निधिवासकर ऊर्फ नेवासकरच होय. सच्चिदानंद बाबा कुलकर्णी हे ज्ञानेश्वरांचे लेखक हेहि या नेवाशाचेच. महानुभवांच्या स्थानपोथींत सहाशें वर्षांपूर्वीच्या नेवाशाच्या म्हाळसेचें प्रत्यक्ष पाहिलेलें वर्णन रा. नेने यांनीं शोधून काढलें तें व नेवाशाच्या कणेरेश्वराचा शके ११६१ मधील शिलालेख रा. खरे यांनीं शोधून काढला. हीं साधनें भा. इ.

सं. मंडळानें प्रसिद्ध केलीं. आणखी पुष्कळ साधनें मिळ-ण्याचा संभव आहे. नेवाशासच उत्खननहि केलें पाहिजे. मग नेवाशाचें सुंदर ऐतिहासिक वर्णन देतां येईल. रा. बडवे यांनीं हौसेनें पुढें येऊन जी थोडी माहिती प्रसिद्ध केली आहे, ती आज त्रोटक वाटली तरी उद्या तींत चांगली भर टाकतां येण्याजोगी आह. या भावी कार्याला रा. बडवे यांनीं शुभारंभ करून दिला आहे. एका वृत्तिवंत ग्रामस्थानें या कामीं हौस दाखविली हें विशेष कौतुकावह आहे. या पुस्तकाचा उपयोग मोहिनीराजभक्तमंडळी करून घेतील अशी आशा आहे. पुस्तकांत घातलेलीं चित्रें चांगलीं व सुबक निघालीं आहेत.

पौष शु. १०|६२ }
पुणें. }

दत्तो वामन पोतदार.

# पायरोवर

श्रीमोहिनीराजदर्शन हें छोटें पुस्तक वाचकांचे हातीं पडतांच त्यांना अतुल आश्चर्य व अमोल आदर वाटेल यांत शंकाच नाहीं. कारण यांत **दक्षिणची काशी** म्हणजे **श्रीक्षेत्र निधिनिवास** व **श्रीमहालया** ऊर्फ **श्रीमोहनीराज** यांबद्दलची पौराणिक, ऐतिहासिक आणि विशेष माहिती दिलेली आहे. याशिवाय पंच-क्रोशींतील व आसपासच्या प्रेक्षणीय स्थळांची त्रोटक माहिती दिली असल्यामुळें हें पुस्तक मोहिनीराज भक्तांना व त्याचप्रमाणें जिज्ञासु प्रवाशांना सुद्धां संग्राह्य व वाचनीय झालें आहे.

या क्षेत्राबद्दलची माहिती संस्कृत ग्रंथाशिवाय इतरत्र नसल्यामुळें सामान्य वाचकांना मिळत नव्हती. परंतु देवस्थानचे पुजारी न. मु. बडवे, वैद्य यांनीं हें पुस्तक लिहून ही उणीव दूर केली आहे. खरोखर ह्या क्षेत्राचा महिमा व गुणच असा आहे कीं, महाराष्ट्राचें आद्य कवि ज्ञानेश्वरमहाराज यांनीं संस्कृत गीतेचें ज्ञान मराठी भावार्थदीपेकेचे द्वारें नेवासें येथेंच सामान्य जनतेस दिलेलें आहे.

श्रीमोहिनीराज सान्निध्यांत असलेले माझे उत्साही व तरुण मित्र न. मु. बडवे वैद्य यांना हें पुस्तक

लिहिण्याची स्फूर्ति झाली व संस्कृतांतील अमृतवांटणीचा इतिहास मराठींत आणून हें शब्दामृत त्यांनीं वाचकांस वाटलें, याबद्दल मी तर त्यांना धन्यवाद देतोंच, परंतु वाचकही त्यांना याबद्दल धन्यवाद देतील अशी आशा आहे.

वाचकवृंद श्री. बडवे यांच्या या कृतीचें कौतुक करतील व श्रीमोहिनीराजकृपेनें त्यांचे हातून अशीच आणखीही कृति घडो अशी मी पायरीवर बसून आशा करतों.

कवि निर्मळ

नेवासें. र. म. जोशी, चिंचोलीकर.

ता. बीड.

## ओळख [ सभामंडपांत ]

नोकरीनिमित्त नेवाश्यास येणें झालें. त्यावेळीं बरेच दिवसांपासून ऐकून असलेलें श्रीमोहिनीराज देवस्थान पाहण्याचा योग आला. निरनिराळ्या ठिकाणच्या देवस्थानांची माहिती देणारीं पुस्तकें वाचण्यास मिळतात. त्याप्रमाणें येथील देवस्थानच्या माहितीचें पुस्तक वाचण्यास मिळेल असें वाटत होतें. परंतु अशा रीतीनें माहितीचें पुस्तक अद्यापपर्यंत प्रकाशित नसल्याचें कळलें. परंतु देवस्थानचे पुजारी व माझे मित्र वैद्य न. मु. बडवे यांनीं सदर माहितीचें पुस्तक लिहून तें छापून काढण्याचा प्रयत्न चालविलेला पाहिला व त्यांनीं हस्तलिखितें मला वाचण्यास दिलीं. त्यामुळें देवस्थानची संपूर्ण माहिती मिळून मनास समाधान वाटलें. मित्रवर्य बडवे यांनीं परिश्रमपूर्वक जें हें पुस्तक तयार केलें, त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. कारण लांबलांबून लोक येथें येतात व परत आपले गांवीं गेल्यावर मित्र-मंडळींनीं किंवा आप्तेष्टांनीं माहिती विचारली असतां "काय बुवा, प्रत्यक्ष दर्शन घेतलें परंतु माहिती सांगतां येत नाहीं" असे उद्गार काढतात. परंतु या पुस्तकानें आतां लोकांचें समाधान केलेलें आहे, असें माझ्याप्रमाणें इतरांनाही वाटेल असें मला वाटतें. माझ्या मित्रानें जें हें परिश्रमपूर्वक पुस्तक तयार केलें आहे, त्याचें जिज्ञासु व भक्तगण चीज करतील अशी आशा आहे.

नेवासें.

डॉ. म. क. दामले,
L.C.P.S. (Bom.)

# भाग १ ला

—***—

-१-

## समुद्र मंथनाचें कारण

एकदां इंद्र ऐरावतावर बसून चालला असतां दुर्वास ऋषींची व त्याची मार्गांत गांठ पडली; तेव्हां त्यांनीं प्रसाद म्हणून इंद्राला आपल्या गळ्यांतील माळ दिली; पण ऐश्वर्यानें उन्मत्त झालेल्या इन्द्रानें ती माळ घेऊन ऐरावताचे मस्तकावर टाकिली, आणि त्यानेंही ती घेऊन पायांखालीं तुडविली. हा प्रकार पाहून दुर्वास ऋषींना क्रोध आला व त्यांनीं इन्द्राला असा शाप दिला कीं, "तूं आणि तुझ्यासहित हें त्रैलोक्य ऐश्वर्य-रहित होईल."

दुर्वास ऋषींच्या शापानें इन्द्र ऐश्वर्यरहित झाला, असें पाहून दैत्यांनीं देवावर स्वारी केली. युद्धांत पुष्कळ देवांचा संहार झाला व इन्द्राचा पराभव झाला. तेव्हां सर्व देवांसह इन्द्र ब्रह्मदेवाकडे गेला व त्यांना त्यानें देवांची स्थिती सांगितली. तेव्हां विचार करून ब्रह्मदेव म्हणाले, "देवहो, या संकटांतून पार

पाडण्यास एक परमेश्वर (श्रीविष्णू) मात्र समर्थ आहे; त्याकरितां मी, शंकर व तुम्ही सर्वजण मिळून क्षीर-समुद्रांत विष्णूकडे जाऊं म्हणजे या संकटांतून पार पडण्याचा मार्ग तो आपणांस सांगेल." असें म्हणून ते सर्वजण भगवान् विष्णूकडे गेले व त्यांनीं विष्णूची स्तुती केली.

ती स्तुती ऐकून भगवान् प्रसन्न झाले व त्यांनीं देवांना आगमनाचें कारण विचारलें. तेव्हां ब्रह्मदेवानें त्यांना सर्व हकीगत सांगितली. नंतर श्रीविष्णू म्हणाले, "या संकटांतून मुक्त होण्यास मी तुम्हांला एक युक्ति सांगतों, त्याप्रमाणें तुम्ही केल्यास संकटमुक्त व्हाल. सध्यां दैत्य व दानव यांना काल अनुकूल आहे, तेव्हां आपला कार्यभाग साधण्यासाठीं ज्याप्रमाणें पेटाऱ्यांत सांपडलेला सर्प बाहेर निघण्यास मार्ग सांपडावा म्हणून उंदराशीं मैत्री करतो त्याप्रमाणें तुम्ही दैत्य जरी तुमचे शत्रू आहेत तरी त्यांचेशीं मैत्री करा. नंतर मृत प्राण्यालाही अमर करणारें जें अमृत तें उत्पन्न करण्याचा प्रयत्न करा. तो असा कीं, प्रथम वल्ली, तृण, लता व औषधी आणून क्षीर-सागरामध्यें घाला; नंतर मंदर पर्वताची रवी करून त्याला वासुकीची दोरी गुंडाळा व एका बाजूला दैत्य व एका बाजूला तुम्ही अशा प्रकारें ती दोरी धरून त्या क्षीरसागराचें

मंथन करा. पण देवांनो, एक लक्षांत ठेवा कीं, असूर जें म्हणतील त्याला मुकाट्यानें अनुमोदन द्या. त्यांच्या इच्छेविरुद्ध बोलूं नका. समुद्रांतून ज्या वस्तू निघतील त्यांमध्यें कालकूट विष निघेल त्यास भिऊं नका आणि इतर वस्तूविषयीं काम, क्रोध किंवा लोभ दाखवूं नका."

---

–२–

## समुद्रमंथन

त्यानंतर ब्रह्मदेव व शंकर स्वस्थानीं निघून गेले; व इतर देव दैत्यराज बलीकडे गेले. देव निःशस्त्र आले आहेत असें पाहून त्यांच्याशीं युद्ध करण्यास दैत्य-सेनापति उद्युक्त झाला. पण बळीराजानें त्याचें निवारण केलें व देवांना त्यांच्या आगमनाचें कारण विचारलें. तेव्हां इन्द्रानें भगवान् विष्णूनें सांगितलेल्या अमृत प्राप्तीकरतां समुद्रमंथनाचा उपाय सांगितला. या वेळेस बलिराजाचे सभेंत त्याचे मोठमोठे सरदारदर-कार हजर होते, त्यांना व बळीराजाला ही गोष्ट पसंत पडली.

नंतर देवदैत्यांनीं मिळून समुद्रमंथनास अवश्य असलेल्या जिनसा जमाविण्यास सुरवात केली. प्रथम

मंदर पर्वत बलात्कारानें उपटून ते तो समुद्रतीरावर नेऊं लागले. त्या प्रचंड पर्वताचें ओझें आणतां आणतां देव व दैत्य अगदीं थकून गेले. शेवटीं श्रीविष्णूच्या साह्यानें त्यांनीं तो पर्वत समुद्रकांठीं आणला. समुद्र मंथनांतून निघणाऱ्या अमृताचा कांहीं भाग देण्याचें कबूल करून देवदैत्यांनीं वासुकीला आणला व त्याचा दोर केला.

त्या वेळीं दैत्यांना चिडविण्याकरतां म्हणून मुद्दाम भगवंतानें प्रथम वासुकीच्या तोंडाची बाजू धरली, व इतर देवांनीं त्याचें अनुकरण केलें. परंतु अमंगळ अशी शेपटीची बाजू आपल्या वाट्याला आली असें पाहून ते मानी दैत्य ती बाजू धरण्यास तयार होइनात. तेव्हां आपला हेतु सिद्ध झाला असें पाहून देवांनीं दैत्यांना मुखाकडील बाजू देऊन आपण पुच्छाकडील बाजू धरिली. अशा रीतीनें घुसळणें सुरू केलें. त्या वेळीं तो प्रचंड पर्वत बुडूं लागला. देवदैत्यांनीं तो बुडूं नये म्हणून पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ; शेवटीं भगवंतानें स्वतः कासवाचें रूप घेऊन तो बुडणारा पर्वत आपल्या पाठीवर घेतला, व पुन्हा घुसळणें सुरू केलें; परंतु आतां तो पर्वत डळमळूं लागला व त्यामुळें घुसळण्याचें काम नीट होईना. तेव्हां भगवंतानें एक अजस्र बाहुपुरुषाचें रूप धारण केलें व आपला एक

हात पर्वताचे मस्तकावर ठेवला. अशा रीतीनें खालीवर चांगला आधार मिळाल्यामुळें पर्वताचें बुडणें व हलणें बंद झालें; तेव्हां देवदैत्यांना घुसळण्यास चांगलें अवसान सांपडलें व त्यांनीं मंथनाचें कार्य जोरानें सुरूं झालें

या घुसळण्याच्या योगानें वासुकिच्या नेत्रांतून व मुखांतून विषमय ज्वाला निघूं लागल्या आणि दैत्य मुखाकडे असल्यामुळें त्यांपैकीं कित्येकजण त्या ज्वालांनीं जळून गेले, व कित्येक भाजले गेले. एकंदरींत ती आग त्यांना सहन होईना. देव जरी शेपटीकडे होते तरी तिकडे येणाऱ्या वाफाऱ्यानेंच त्यांची दुर्दशा झाली. तेव्हां भगवंतानें मेघास पर्जन्य पाडण्यास आज्ञा केली त्या योगानें आणि समुद्राच्या लाटांच्या तुषारांनीं देव दैत्यांचा दाह कमी झाला.

इतकीं संकटें व प्राणहानी सोसूनही जेव्हां अमृत निघेना तेव्हां भगवान् अजित स्वतःच मंथन करूं लागला. यावेळीं भगवंतानें प्रचंड रूप धारण केलें. सर्वशक्तिमान् परमेश्वर स्वतः मंथन करूं लागला, तेव्हां घुसळण्याचा वेग फारच भयंकर झाला. समुद्र अगदीं खवळून गेला. त्यांतील जलचरांना जीवाची भीती वाटूं लागली. इतक्यांत समुद्रांतून हलाहल हें विष निघालें. हें विष बाहेर येतांच त्याच्या ज्वालांनीं त्रैलोक्य तळमळूं लागलें. सर्व प्रजा अगदीं घाबरून

गेल्या. त्या प्रसंगांतून त्यांना वांचविणारा कोणीही दिसेना. शेवटीं सर्व देव कैलासपर्वतावर भगवान् शंकराकडे गेले. तेथें शंकर तत्त्व-विचार करीत बसले होते. त्यांना देवांनीं वंदन करून त्यांची स्तुती केली. त्या स्तुतीनें भोळा शंकर प्रसन्न झाला व तो पार्वतीला म्हणाला, "देवी, समुद्रांतून निघालेल्या हलाहल विषापासून ह्या सर्व प्रजाजनांना अत्यंत त्रास होत आहे. त्यापासून त्यांचें रक्षण करणें हें माझें कर्तव्य आहे. म्हणून मी तें विष प्राशन करून त्रैलोक्याचें संकट निवारण करतों." शंकराचें सामर्थ्य पार्वतीस माहीत असल्यामुळें तिनें त्यांच्या ह्या कृत्यास संमति दिली. नंतर महादेवानें तें विष आपल्या तळहातावर घेऊन प्राशन केलें. विष लोककल्याणाकरतां शंकरानें प्राशन केलें खरें, परंतु त्यानें आपला प्रताप त्यांचेवर गाजविलाच; त्या योगें त्यांचा कंठ निळाकाळा झाला. भक्त-संकट-निवारणार्थ शंकरानें हें अद्भुत कर्म केलें, म्हणून देवांनीं पुन्हां त्यांची स्तुती गाईली. शंकर विष प्राशन करीत असतां त्यांतील कांहीं अंश खालीं सांडला तो सर्प, विंचू इत्यादि प्राण्यांनीं व बचनाग कण्हेर इत्यादि वनस्पतींनीं प्राशन केला.

त्या नंतर देवदैत्यांनीं पुन्हां मंथन सुरू केलें. तेव्हां समुद्रांतून चौदा रत्नें निघालीं. प्रथम कामधेनु निघाली,

होमहवनांस लागणारें दूध तूप तिच्यापासून उत्पन्न होतें म्हणून वेदवेत्त्या ऋषींनीं तिचा स्वीकार केला. नंतर पांढराशुभ्र असा उच्चैःश्रवा नामक अश्व निघाला, दैत्यराज बळीनें तो मागितला, म्हणून त्यास तो दिला. नंतर शुभ्र वर्णाचा व चार दांतांचा असा ऐरावत नामक हत्ती निघाला, त्याचा इन्द्रानें स्वीकार केला, नंतर पद्मनाभ जातीचें कौस्तुभ रत्न निघालें तें भगवान् विष्णूला अर्पण करण्यांत आलें; व तें त्यानें आपल्या वक्षःस्थलावर धारण केलें. नंतर पारिजातक वृक्ष निघाला त्याची स्वर्गलोकीं स्थापना केली. याजपासून तेथील लोकांस इच्छित वस्तू प्राप्त होतात. नंतर अत्यंत रूपवान् अशा अप्सरा निघाल्या, त्या देवांना अर्पण केल्या. यानंतर लक्ष्मी व सुरा निघाल्या. त्यांच्या वांटणीबद्दल बराच वाद झाला, शेवटीं लक्ष्मीनें स्वतःच विष्णूची निवड केली; व सुरा दैत्यांना देण्यांत आली. या नंतर पुन्हां मंथन कार्य सुरू झालें. त्या वेळीं भवसागरांतून एक अद्भुत पुरुष निघाला. तो वयानें लहान असून त्याची शरीरयष्टी सुदृढ व अंगकांती सुंदर होती. त्याच्या हातांत अमृताचा कलश होता. हा धन्वंतरी होय. तो विष्णूचा अंश असून वैद्यशास्त्रांत निष्णात होता. त्याच्या हातांत असलेला अमृताचा कलश हिसकाऊन घेऊन, दैत्य दंडकारण्यांत पळून गेले. दैत्यांनीं

अमृत नेलें, हें पाहून देव खिन्न झाले व ते ईश्वराला शरण गेले. देवांची ती स्थिती पाहून भगवंतानें त्यांना धीर दिला व दैत्याकडून अमृत मिळवून देण्याचें आश्वासन दिलें.

---

–३–

## मोहिनी अवतार

इकडे दैत्यांनीं अमृताचा कलश नेला खरा, पण अमृत प्राशनाबद्दल त्यांचा आपापसांत कलह सुरू झाला. एक म्हणे मी आधी पिणार दुसरा म्हणे मी आधी पिणार असा प्रकार सुरू झाला. त्यांपैकीं जे अशक्त होते त्यांना वाटलें कीं दांडग्या लोकांपुढें आपला निभाव लागणें शक्य नाहीं व आपल्याला अमृत मिळणें कठीण आहे. तेव्हां त्यांनीं युक्तिवाद करण्यास सुरुवात केली. ते म्हणाले "दैत्यहो! उगाच झगडा माजवूं नका. अमृत प्राप्तीकरतां देवांनीं व आपण सारखेच श्रम केले आहेत, तेव्हां अमृतावर आपला एकट्याचा हक्क नसून त्यांनाही त्यांचा भाग मिळाला पाहिजे" अशारीतीनें त्यांचा आपसांत झगडा चालू आहे, असें पाहून भगवान् विष्णु स्त्री वेष धारण करून त्यांचेपुढें प्रकट झाले. हाच 'मोहिनी अवतार' होय.

याचेळीं भगवंतानें घेतलेलें स्त्रीरूप अवर्णनीय होतें. त्या स्त्रीचा वर्ण नील कमलाप्रमाणें श्यामल असून सर्व अवयव रेखीव व गोंडस होते. तिच्या कानांत जी बहुमोल कुंडलें होतीं, त्यांची प्रभा तिच्या गालावर पडल्यामुळें तिचें मुख-कमल फारच रमणीय दिसत होतें. तिच्या मुखांतून निघणाऱ्या श्वासाच्या सुगंधावर लुब्ध होऊन भ्रमर तिच्या भोंवतीं गुंजारव करीत होते. त्या नव-यौवनसंपन्न कृशकटि स्त्रीनें आपल्या आंबाड्याभोंवतीं मोगरीचा फुललेला गजरा घातला होता. कंठांतील अलंकारांनीं तिची मान फारच मनोहर दिसत होती. तिनें नेसलेलें वस्त्र पांढरेशुभ्र असून तें इतकें नाजूक होतें कीं, दुरून पाहणारास तिच्या अवयवांची ठेवण स्पष्ट दिसत होती. तिच्या पायांतील नूपुरांच्या मधुर ध्वनीनें सर्वांचीं मनें तिजवर अत्यंत लुब्ध झालीं. अशा रीतीचें जिचें रूप होतें, तिनें आपल्या नेत्रकटाक्षांनीं दैत्यांना आपल्या अंकित करून घेतलें.

अशा रीतीचें रूप धारण करून ज्या ठिकाणीं दैत्य अमृत वांटणीकरतां आपसांत भांडत होते. त्या ठिकाणीं भगवान् विष्णू प्राप्त झाले. दैत्य ज्या ठिकाणीं भांडत होते, तें ठिकाण-अत्यंत निबीड असें अरण्य होतें, त्या ठिकाणीं अशी सुंदर स्त्री पाहून त्यांना फार

आश्चर्य वाटलें व ती स्त्री कोण आहे हें जाणण्याकरतां ते सर्वजण त्या स्त्रीचे भोंवतीं गोळा झाले; व ते तिला म्हणाले, "हे कमल नयने, चारुगात्री! ह्या निबिड अरण्यामध्यें कोणाचीही वस्ती नसतांना तूं या ठिकाणीं कोठून आलीस? व तूं कोणाची कोण आहेस? व येथें कशाकरतां आलीस? आम्ही (देव व दैत्य) अमृत प्राप्तीकरतां भांडत असतां तूं येथें प्राप्त झालीस, तरी आमचेमध्यें उत्पन्न झालेला तंटा तूं मिटवावा असें आम्हांस वाटतें." दैत्यांचें हें बोलणें ऐकून स्त्रीरूप श्रीहरीला किंचित् हसूं आले व दैत्यावर आपली जास्त छाप बसविण्याकरितां ते त्यांच्याकडे पहात हंसत हंसत म्हणाले, "हे कश्यप पुत्रहो! तुम्ही असलें महत्त्वाचें काम मजवर सोपवितां हें चांगलें नव्हें. कारण स्त्री ही चंचल बुद्धीची असल्यामुळें तिच्यावर विश्वास ठेवूं नये असें सूज्ञ म्हणतात. तेव्हां हें काम तुम्हीं मजवर सोपवूं नये." मोहिनीच्या या छद्मी भाषणानें दैत्यांचा तिजवर पूर्ण विश्वास बसला व त्यांनीं अमृताचा कलश तिचे स्वाधीन केला व तें देव दैत्यांना वांटून देण्यास त्यांनीं तिला सांगितलें. मोहिनीनें तो कलश आपल्याजवळ घेतला व ती दैत्यास म्हणाली, "दैत्य हो! मी नको नको म्हणत असतां हें काम तुम्हीं मजवर सोंपवीत आहां; पण हें

काम करतांना मला माझ्या इच्छेप्रमाणें तुम्ही मला वागूं दिलें पाहिजे; त्याबद्दल तुम्हीं तक्रार करतां कामा नये. हें कबूल असेल तर मी हें काम करतें." मोहिनीचें हें भाषण ऐकतांच दैत्यांनीं कांहीं एक विचार न करतां एकदम "ठीक आहे, कबूल." असें म्हटलें.

नंतर त्यांनीं अमृत प्राशनाच्या तयारीस सुरवात केली. त्या सर्वांनीं प्रथम स्नान करून अग्नीमध्यें हवीद्रव्यांचा होम केला. त्या दिवशीं ते उपोषीत राहिले. त्यांनीं गाई, ब्राह्मण व सर्व प्राण्यांना अन्नदान केलें. ब्राह्मणाकडून पुण्याहवाचन करून त्यांनीं आपापल्या आवडीचीं वस्त्रें परिधान केलीं. नंतर पुष्पांनीं व दीपांनीं सुशोभित केलेल्या मंडपांत ते सर्व दैत्य आले आणि दर्भासनावर पूर्वाभिमुख बसले. ह्या मंडपांत देवही बसले. त्यावेळीं मोहिनी आपल्या हातांत अमृताचा कलश घेऊन सलज्ज सस्मित अशा आविर्भावानें सभेंत प्राप्त झाली. तेथें आल्यावर तिनें देवांना व दैत्यांना निरनिराळ्या पंक्तींत बसविलें. दैत्यांना तिच्या रूपाचा इतका मोह पडला कीं, ती जें बोलेल तेंच अमृत आहे असें त्यांना वाटे. मोहिनीनें आधींच त्यांजकडून वचन घेतलें होतें कीं, मीं कांहीं जरी केलें तरी तुम्ही तें कबूल केलें पाहिजे; व त्यांनींही तिला यथान्याय वाटणी कर म्हणून सांगितलें होतें. या दोन्ही

गोष्टींत तिनें आपल्याला हवी तशी सवड साधून घेतली. तिनें विचार केला कीं, देवांना अमृतपान करविणें हेंच योग्य. कारण दैत्यांनीं आपणास यथान्याय वांटणी करण्यास सांगितलें आहे. तेव्हां न्याय म्हटला कीं, दैत्य हे क्रूर असल्यामुळें त्यांना अमृत पाजणें अनिष्ट आहे. याकरितां फक्त देवांनाच अमृत पाजलें पाहिजे. पण असें केल्यास दैत्य दंगा करतील, म्हणून तिनें दैत्यांची गोड शब्दांत समजूत केली कीं, देव हावरे आहेत, त्यांना दम निघणार नाहीं; याजकरितां त्यांनाच आधीं अमृत पाजतें, म्हणजे त्यांचा त्रास राहाणार नाहीं. अशा रितीनें तिनें दैत्यास चढवून देवास अमृत पाजण्यास सुरुवात केली. दैत्यांना तिचें हें कपट समजून आलें. परंतु ते वचनबद्ध झाले असल्यामुळें त्यांनीं तोंडांतून ब्रही काढला नाहीं. शिवाय आपण बोललों तर मोहिनीला राग येईल म्हणून ते गप्प बसले.

याप्रमाणें मोहानें व वचनानें बद्ध झालेले दैत्य गप्प बसले असतां, त्यांतून राहू नांवाचा दैत्य उठला व देवाचा वेष घेऊन चंद्र व सूर्य यांच्यामध्यें जाऊन बसला व सर्वांबरोबर अमृत पिऊं लागला, पण त्याचें हें कपट चंद्रसूर्यांनीं ओळखून मोहिनीला खुणेनें सांगितलें. तेव्हां राहूनें प्राशन केलेलें अमृत त्याच्या

घशाखालीं उतरलें नाहीं तोंच मोहिनीनें आपल्या कुंडलानें त्याचा शिरच्छेद केला. यावेळीं श्रीविष्णूला चक्राची जरूर लागली, परंतु विष्णुरूपाशिवाय चक्राचें आवाहन करतां येत नव्हतें; व पूर्ण विष्णुरूप प्रकट केल्यास दैत्य पळून जातील, किंवा मोठा रणसंग्राम माजेल, म्हणून विष्णूनें अर्धे विष्णू (नर) व अर्धें स्त्रीरूप ठेवून राहूचा शिरच्छेद केला आणि ह्या रूपानें–महालया–मोहिनीराज–अर्धनारीनटेश्वर म्हणून पुढें विष्णू प्रसिद्ध झाले व तोच मोहिनीराज अवतार होय.

---

–४–

## महालया क्षेत्र

राहूचा शिरच्छेद केला तेव्हां त्यानें प्राशन केलेलें अमृत नदींत (प्रवरेंत) पडलें म्हणून तिला अमृतवाहिनी असें म्हणतात. याप्रमाणें भगवान् विष्णूनें आपणांस अमृत मिळवून दिलें म्हणून देवांनीं विष्णूची –मोहिनीराजाची–स्तुती गाईली. (पुरुष प्रकृतीस्तव) व ज्या रूपांत राहूचा वध केला त्या अर्धनारीनटेश्वर रूपांत राहण्याची देवांनीं विष्णूला विनंती केली. हें रूप

महालया नांवानें प्रसिद्ध राहील, जेथें या रूपानें मी राहील, त्या ठिकाणास महालया क्षेत्र नांव प्राप्त होईल व तेथें मी गुप्त रूपानें वास करीन, असें श्रीविष्णूनीं सांगितलें.

पुढें कांहीं कालानंतर तारकासूर नांवाच्या दैत्यानें देवांचा पराजय केला; व त्याच्या भीतीनें त्रासून जाऊन देव श्रीविष्णूस शरण गेले व त्यांनीं राहण्याकरितां जागा मागितली. तेव्हां विष्णूनें त्यांना महालया क्षेत्रांत राहण्यास जाण्यास सांगितलें. कारण तेथें विष्णू स्वतः गुप्तरूपानें–महालया शक्ति–वास करीत होते. त्या ठिकाणचा त्यांनीं पुढीलप्रमाणें उल्लेख केलाः–" विंध्यस्य दक्षिणेभागे गोदायां दक्षिणेतटे। पंचक्रोशात्मकं क्षेत्रं वरानदी शुभा। तस्याश्च पूर्व भागेहि वैष्णवी शक्तिरद्भुता। याप्रमाणें वर्णन केलेलें महालया क्षेत्र म्हणजे हल्लींचें मुळा-प्रवरा संगमापासून गोदा-प्रवरा संगमापर्यंतचें पांचेगांव तें प्रवरा संगम नेवासें हें क्षेत्र होय. सर्व देव त्या ठिकाणीं राहावयास गेले. त्यांचेबरोबर त्यांचा खजिनदार कुबेर आपल्या सर्व संपत्तीसह राहावयास गेला व सर्वजण तेथें शंकरपुत्र कार्तिकस्वामी याचा जन्म होऊन त्यानें तारकासुराचा वध करीपर्यंत राहिले; त्यामुळें ह्या क्षेत्रास श्रीनिवास किंवा निधीनिवास असें नांव मिळालें. देव जो पर्यंत येथें

राहात होते तों पर्यंत त्यांनीं येथें बरींच सत्कृत्यें केलीं म्हणून ह्या क्षेत्रास फार महत्त्व प्राप्त झालें.

भगवान् विष्णू ह्या क्षेत्रांत गुप्त रूपानें रहातात, ते प्रगट रूपानें रहावे म्हणून शांडिल्य या नांवाच्या ब्राह्मणास वाटलें म्हणून त्यानें मधु (प्रवरा) मालती (मात्रा) या नद्यांच्या संगमावर दीर्घकालपर्यंत खडतर तप केलें. त्या तपानें भगवान् विष्णू प्रसन्न झाले व त्यांनीं ब्राह्मणास तपाचें कारण विचारलें. तेव्हां त्यानें आपली इच्छा त्यांस सांगितली व विष्णूनीं कबूल केलें व त्यांनीं त्यास देवांचा कारागिर जो विश्वकर्मा त्याचेकडून आपली प्रतिमा तयार करून घेण्यास सांगितलें त्याप्रमाणें शांडिल्यानें विश्वकर्म्याकडून श्रीविष्णूची महालया रूपाची मोहिनी राजाची-अर्धनारी नटेश्वर मूर्ती तयार करवून घेतली व तिची स्थापना ह्या क्षेत्रांत केली.

# मोहिनी स्तव

कवि—रं. म. जोशी ऊर्फ निर्मळ,
[हे. मा. लो. बो. स्कूल, मौ. मुंगी ता. शेवगांव.]

— १ —

अमृतवाहिनी तीर निवासामहालया अवतार महा।
अर्धनारी नटेश्वर नांदे श्रीमोहिनीराज पहा ॥
समुद्र मंथुनि सुरासुरांनीं रत्नें चौदा काढियलीं।
अमृतपंक्तीमधें कपटि तो राहु छेदिला त्या काळीं ॥
असुरांना ती दिसे मोहिनी विष्णुरूप देवां दिसलें।
तेंच रूप हें मूर्तिरूपानें निवासक्षेत्रीं राहियलें ॥
शंखचक्र घटगदा घेउनी राहु मर्दिला एकपदीं।
कर्णी कुंडल मुकुट शोभतो दिव्य तेज तें बघा अधी ॥
अभय देउनि संकटकाळीं पूर्ण कामना करी अहा।
निवासक्षेत्रीं प्रभू नांदतो श्रीमोहिनीराज पहा ॥

— २ —

राग–भिमपलास ] पद [ चाल–योग्य न प्रेम.

मोहिनिराज आमुचा तारी सुजना जगतीं। भाव ठेवा मनिं साचा ॥ धृ ॥ अर्ध अंगि नटनारी। मोहिनि ही अवतारी। मूर्ति कशी मनहारी। पूज्य हाचि सकलांचा। १।



श्रीमोहिनीराज मूर्ति, नेवासें



ज्ञानेश्वरी खांब

— ३ —

झडकरि मजपावे मोहिनी माय आतां ।
धन कण कनकांहीं वेढिलें वाढ होतां ॥
निशिदिनि सुख व्हावें तवपदीं नाम गातां ।
तवपद रज मातें शांतवीतील माथा ॥१॥
सुमधुर जल वाहे अमृता रोज प्यावें ।
म्हणुनि निधिनिवासीं वाटतें कीं रहावें ॥
सुदिन नयन हारी उत्सवा कीं, पहावें ।
जन मन नितधाले मोहिनीनाम घ्यावें ॥२॥
घटपट अयुधांनीं तेज तेवून राही ।
पुलकित अति वाटे मंत्र घोषे न राही ॥
सकल विफल दुःखें सांडिती मंदिरांत ।
तवपदि सुख वाटे मोहिनीराज शांत ॥३॥
कळस दिसुनि येई पंचक्रोशींत जेव्हां ।
नमन करिति मोदें भक्त तेथेंच तेव्हां ॥
भजन पुजन भावें म्हाळसा मोहिनीचें ।
करित सतत जावें कार्य हें निर्मळाचें ॥४॥

---

# आरती

(न. मु. बडवे)

उत्तम स्थळ नेवासें वससी जे स्थळीं ।
कुंकुम केशररेखा शोभतसे भाळीं ॥
श्रवणीं कुंडलदीप्ती मंडित तेजाळीं ।
श्रीमुखाची शोभा दिनमणिहुनि आगळी ॥१॥

जयदेव जयदेव जय मोहिनिराजा ।
कमली अर्पुनी कमला नमितों मी सहजा ॥
जयदेव जयदेव ॥ ध्रु० ॥
शंख चक्र गदा सुथळी दिव्यांबर भुषणें ।
करि कंकण मुद्रिका शोभायमाने ॥
श्रीवत्सलांच्छन पदक मिरवी भगवान ।
अदू तोरड वाकी गर्जेति रुणझूण ॥२॥ जयदेव०॥

अगाध महिमा पिंडीं ब्रह्मांडीं गाजे ।
मर्दुनियाऽसूरा स्त्रीरूपी विष्णू विराजे ॥
अमरा पीयुषपान करविले सहजे ।
अर्धनारि नटेश्वर प्रसिद्धरुप गाजे ॥३॥ जयदेव०॥

अगमा निगमा अगोचर अघटित तव करणी ।
सर्वा देवाहुनि चालक परि नेणे कोणी ॥
अघटित स्वरूप हरिचें भरिलें लोचनीं ।
म्हणे नरहरी तन्मय दिन आणि रजनी ॥४॥ जयदेव०॥

## ध्यान

क्षेत्रं वै निधिनिवास नाम कथितं तत्रैव देवः सदा ।
स्त्रीरूपंधृतवांदिवौकसहिते लौकैः सदा पूज्यते ॥
नेपथ्यं मुकुटंच मौक्तिकफलं भक्त्या सदा धार्यते ।
वामांगे म्हालसा विभूषणयुतां तस्मै नमो वैष्णवे ॥१॥

महालये महादुर्गे महा घोर पराक्रमे ।
निवारयेत् महत् दुःखं त्राहिमाम् करुणेश्वरी ॥२॥

---

## अष्टपदी

ब्रह्मेंद्रादि समस्त देव मिळुनी विरोचना बोधिलें ।
किं क्षीराब्धि मंथुनी दुर्लभ सुधा काढोनि घ्यावे बळें ॥
निष्पानिष्प तुम्हां आम्हांसहि असा संकेत केला पहा ।
भक्ताची मनकामना पुरवी जो तो मोहिनीराज हा ॥१॥

शेषे वेष्टुनी मंद्राचलबळे भूमीहुनी आगळा काढिला ।
देवी दैत्यगणीं महाश्रम वसे सिंधुतटा आणिला ॥
रज्जू वासुकिचा करूनि मथिता निर्मग्न आद्री महा ।
पृष्टी कूर्मपणें गिरी उचलिला तो मोहिनीराज हा ॥२॥

तो मंद्राचल डोलता न टिके देवादिका दानवा ।
त्याचे मस्तकि हस्त ठेवुनी उभा ठाके स्वये तेधवां ॥

आनंदें मथिता चतुर्दश शुभे रत्नें निघालीं पहा ।
वस्तू वाटुनि दे विभाग करुनि तो मोहिनीराज हा ॥३॥

दैत्यांनीं अमृतार्थ भांडोनि स्वयें युद्धासि आले बळे ।
तेव्हां त्वा मोहिनी होऊनि तया शब्दामृतें मोहिले ॥
ताटांकीच अयोग्य राहु वाधिला व्यक्ति जयाचा दहा ।
भक्ताची मनकामना पुरवि जो तो मोहिनीराज हा ॥४॥

भक्ती सौरभ पंचरत्न सुमनें पुष्पांजली अर्पिली ।
पायीं मस्तक ठेवितां सकरुणा श्रीमोहिनी तोषली ॥
आतां इच्छित मागणें जरि तुम्हां हे कामधेनू दुहा ।
भक्ताभिष्ट निवासनगरी जो तो श्रीमोहिनीराज हा ॥५॥

# भाग २ रा.

—१—

## जुनें मंदिर

अशा रीतीचें देवस्थान ज्या ठिकाणीं आहे तो नेवासें गांव पूर्वीं फार लहान होता. ह्या गांवाजवळ माळी मोहतर्फे म्हणून एक दुसरा लहान गांव होता. व या दोन्ही गांवापासून पाव मैल अंतरावर लाडमोड हा मोठा गांव होता. लाडमोड हा गांव सुभ्याचें ठिकाण होतें व तें देवगिरी ( दौलताबाद ) च्या यादव (जाधव) राजांच्या अंमलाखालीं होतें. मराठी भाषेचें आद्य प्रवर्तक श्रीज्ञानेश्वर महाराज यांनीं या गांवाजवळचे श्री करवीरेश्वर महादेवाचे देवालयांत बसून आपला सुप्रसिद्ध ग्रंथ "भावार्थ दीपिका" हा लिहिला. ( शके-१२१२ इ. स. १२९० ) त्या ग्रंथांत श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं ह्या गांवाचें व देवस्थानाचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे--

ऐसें युगीं परिकळी । आणि महाराष्ट्र मंडळी
श्री गोदावरी जवळी । निवासस्थान ॥

तें त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र
जेथ जगाचें जीवनसूत्र । श्री महालया वसे ॥
जेथ रघुवंश विलास । जो सकलकला निवास
न्यायातें पोशी क्षितीश । श्री रामचंद्र ॥
तेथ महेशान्व संभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुते
केलें ज्ञानदेवें गीते । देशकार लेणें ॥

ज्ञा. अ. १८/१८०२ ते ५.

निधिनिवास म्हणजे नेवासें हें सिद्ध करणारा एक लेखी आधार उपलब्ध झाला आहे. नेवासें येथें महालया देवीचें प्रसिद्ध स्थान आहे. या महालयेचें महात्म्य गोपाळ कवीनें ओवी वृत्तांत वर्णिलें आहे. त्यांत सर्वत्र नेवासें गांवाचें नांव "निधिनिवास" या नांवानें उल्लेखिलेलें आहे. हें स्पष्ट होण्याकरितां त्यांतील अ. १८ पृष्ठ ७ वरील ओव्या खालीं दिल्या आहेत—

प्रवरेचिया दक्षीणतीरीं । उभी लावण्यसिन्धु लहरी ।
जे प्रेमें भक्त काज कैवारी । जगदेश्वरी मुळमाया ॥६२॥
यापरी सत्क्षेत्र निधीवास । पीतरालागी प्रीय विशेष ।
पींडदाने कृते संतोष । अत्यातत्यो होतसे ॥६३॥
निश्चये निधिवासापासोनी । पवित्र गंगा सुरवाहिनी
अमृतावाहा प्रवरा नाम्नी । गोदावरी ज...॥६७॥
माधव म्हणे महालय । निधिवासक्षेत्र पुण्यवर्य ।
विभवामाजी सुखमय । दुजे नाहीं सत्यत्वें ॥८१॥

अध्याय १५ चा शेवट—

इतिश्री पद्म पुराण अपार। महालया चरित्र हें सुंदर। गुणग्राहीका जोडून कर। गोपाळ कवि प्रार्थीतु ॥११५॥. (ग्रंथ नक्कल शके १७८८)

यावरून हल्लींचें नेवासें म्हणजे 'निधीवास' होय.

लाडमोड, माळीमोहतर्फ व नेवासें या तिन्ही गावांना वळसा घालून पूर्वी प्रवरानदी वहात होती. परंतु नदीचे प्रवाहाचे जोरानें खडक फुटून तिचा मूळचा ओघ बदलून ती देवालयाजवळून वाहूं लागली व त्यामुळें नेवासें गांव दुभंगला गेला; व त्याचे नेवासें खुर्द व बुद्रुक असे दोन भाग झाले. त्यांपैकीं खुर्दच्या भागांत जुनें व नवें देवालय आहे म्हणून त्यास मोहिनी-राजाचें नेवासें असें म्हणतात; व बुद्रुक या भागांत खंडोबाचें स्थान आहे, म्हणून त्यास खंडोबाचें नेवासें असें म्हणतात. पुढें अनेक घडामोडी होऊन लाडमोड व माळी मोहतर्फ हीं दोन्हीं गांवें नष्ट होऊन तीं नेवासें खुर्द या गावांत सामील झालीं.

यादवांचें राज्य नाहींसें झाल्यावर अहमदनगरला मुसलमानांचें-निजामशाही-राज्य स्थापन झालें (स. १४९०-१६३६). निजामशाहीचे पडत्या काळांत उदयास आलेले मराठे सरदार शहाजी राजे भोसले हे वेरूळचे

राहणारे होते. ते अहमदनगरास जातांना त्यांच्या वाटेंत हा गांव येई व येथें त्यांचा मुक्काम होई. त्या वेळीं त्यांनीं ह्या देवस्थानास कांहीं देणगी दिली होती. पुढें छत्रपती शिवाजी महाराज उदयास आले व त्यांनीं मराठी राज्य स्थापन केलें. त्या मराठी राज्याचे पहिले सेनापति नेताजी पालकर यांनीं हा गांव मराठी राज्यास जोडला.

छत्रपति शिवाजीमहाराजांचे मृत्यूनंतर औरंगजेबानें दक्षिणेंत स्वारी केली ( सन १६८३ ). त्याचा मुक्काम अहमदनगरला होता व तेथून नेवासें जवळ असल्यामुळें ह्या भागास मुसलमानांचा फार उपद्रव होऊं लागला. त्यावेळीं हिंदूचीं देवळें व देवता नष्ट करण्यास त्यांनीं सुरवात केली. हें संकट आलेलें पाहून त्या वेळचे पुजाऱ्यांनीं मूर्ती लपवून ठेवल्या; त्यामुळें त्या सुखरूप राहूं शकल्या. मुसलमानांनीं देवळाजवळ मशीद बांधली. परंतु मुसलमानी संकट नाहींसें झाल्यावर मूर्ती परत देवालयांत स्थापून संरक्षणाकरितां देवालयाभोंवतीं तटबंदी केली व देवळाचा जीर्णोद्धार करण्यांत आला व पुढें नवें देवालय झाल्यामुळें हें देवालय तसेंच राहिल्यामुळें पडून गेलें. त्याचे अवशेष अद्यापही जीर्णावस्थेंत कायम आहेत. मिशनरी लोकांनीं ख्रिस्ती धर्म प्रचाराकरतां ठिकठिकाणीं चर्चें बांधिलीं.

त्यावेळीं येथेंही चर्च बांधण्याचा प्रयत्न झाला; व त्याकरतां मिशनऱ्यांनीं जुन्या देवळाची जागा सरकारकडून मिळविली. परंतु अन्य कारणामुळें येथें चर्च होऊं शकलें नाहीं. त्यामुळें ती जागा पडीक पडली असून ताबा मात्र मिशनऱ्यांचा आहे.

---

— २ —

## तेराव्या शतकांतील नेवासें

[भारत इतिहास संशोधक मंडळ पुणें, यांचें त्रैमासिक वर्ष १९ वें अंक २ रा (७४) (आश्विन शके १८६०) यांत नागपूरचे रा. ह. ना. नेने, एम्. ए. यांनीं "तेराव्या शतकांतील नेवासें" या नांवाचा लेख महानुभावीय वाङ्मयाच्या आधारें लिहिला. तो प्रो. द. वा. पोतदार यांचे कृपेनें मिळाला. तो खालीं दिला आहे. यावरून नेवाशाबद्दल बरीच माहिती मिळते.]

नेवासें गांवाबद्दल "निधि निवास, नीधिवास, नीवास" अशीं नांवें आढळतात. नागदेवाचार्यांचे (भटोवासांचे) शिष्य केशिराज व्यास यांच्या "रत्न माला स्तोत्रांत" पुढील नोंद सांपडते. "ततो निशायां निधीवासमीशो गच्छन् विलोक्यैक सुरालयं सः ।

विरच्य तत्रासनमी श्वरेषो मुहूर्तएकं निषसाद देवः ॥३९९॥ श्री चक्रधर नेवासें येथें जात असतां त्यांना वाटेंत एक देवालय दिसलें. व तेथें क्षणभर आसन घालून ते बसले. दुसरा उल्लेख पुढीलप्रमाणें आहे. विहृत्यैवं ततो राजटक्कळीं समगात् परः। अरण्यवाटिकायां च प्रातःपूजाशनादिकम् ॥ ५७१ ॥ शयनादि तथा कृत्वा स्थानात् तस्मात् जगादह। निधिवासं समागत्य घोगरग्राम माययौ ॥ ५७२ ॥ श्री चक्रधरराज टाकळीहून नेवाशाला व तेथून घोगरगांवला गेले.

" लीळ चरित्राच्या " उत्तरार्धांत पुढीलप्रमाणें माहिती सांपडते—१७१ व्या लीळेचा प्रारंभ पुढीलप्रमाणें आहे. "डोमे ग्रामूनि नीधिवासेया प्रयाणीं मार्गीं चाचर मुदी आसन " डोमे गांवाहून नेवाशास जात असतां, श्री चक्रधर चाचरमुदीं मुक्कामीं क्षणभर होते. लीळा १७२ मध्यें पुढील मजकूर आढळतो; चाचरमुदी येथें आल्यावर भटोबा चक्रधरांना म्हणतात, मग भटोबाशीं गोसावी याते (श्री चक्रधरांना) विनविलें जी जी मी नीवासेंया जायें कीं एतां जातां हा ठावो पावें आणि बीहें ( भितों ) : " स्थानोपोथीमधें निधीवास " याठिकाणच्या स्थळांची नोंद देऊन शेवटीं ' नीधिवासांचीं स्थानें ' असा उल्लेख केला आहे.

यात्रमाणें 'नेवासें' या नांवाचे विषयीं उल्लेख सांपडतात. 'निधीवासाचे' आजूबाजूंचीं गांवें पुढील-प्रमाणें वरील पोथ्यांतून आलेलीं आहेत. चाचरमुदी, घोगरगांव, देईगांव, डोमेग्राम, रांजणगांव' इत्यादि.

नेवासें येथील स्थळासंबंधीं माहिती "स्थानपोथींत' पुढीलप्रमाणें आहे. ज्या ठिकाणचा नामनिर्देश स्पष्ट आहे, तेवढाच उतारा देत आहे. इतर गोष्टींचा उल्लेख देण्याचें कारण नाहीं. डोमेग्रामूनि बीजें करितां (जात असतां) चाचरमुदी आसनः। पव्हे आसनः। मग गोसावी (चक्रधरांनीं) तेथौनि बीजें केलें: कनरे-श्वरीं आसन : गांवापाशीं मेळा :। कुसुमेश्वरा बीजें केलें: तेथ आसनः। तोचि घाटू : गांवां पसीमे अग्निष्टीका: नदीचीए थडीए उत्तरेः पुरादित्यीं अवस्थानः मासचार :। पुरादित्य पूर्वाभिमुख......दक्षिणे वडुवे याचे घर :। पूर्वे हाटवटी (बाजार ओळ)...... म्हाळसेचें देऊळ पसीमामुख...... दुर्गा आंतु गोपाळाचें देऊळ : पसीमा मुख : गोपाळीहूनि साधे (एक शिष्यीण) म्हाळसी (महालसा) पाहुं पाठविणें : संगमेश्वराचें देऊळ पूर्वा-भिमुख : नीधिवासाचीं स्थानें प्रस्तुत उताऱ्यांत कनरे-श्वर, कुसूमेश्वर, पुरादित्य, गोपाळ, म्हाळसी इत्यादि-कांच्या देवळांचाच केवळ उल्लेख नसून आणखी त्यांपैकीं कांहीं देवळांचें तोंड कोणत्या दिशेला आहे

हेंही दिलें आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. कुसूमेश्वराचा घाट, नदीची थडी, दुर्ग (किल्ला) यांचा उल्लेखही कमी महत्त्वाचा नाहीं.

लीळा चरित्राच्या उत्तरार्धांत या नामनिर्देशांच्या दृष्टीनें कांहीं लीला महत्त्वाच्या आहेत. डोमेग्रामीं श्रीचक्रधरांचा मुक्काम असतां भटोवासांना नेवासें येथें बाजार करण्याकरितां पाठविलें होतें. त्यावेळीं त्यांच्या अंगांत ज्वर होता, तथापि ते गेले होते. या प्रसंगाची लीळा १०६ वी आहे व त्याची 'आदि' पुढीलप्रमाणें आहे. 'वानरेया ज्वर निवृत्ति' भटोवास कणेरेश्वर पातले : तवं अवघे घामैले : मग कणेरेश्वराची घांटीं आंग धुतले : तेणें अवघा ज्वरु गेला.........परत येतांना वामन मतिविलास कनेरेश्वरावरि बोळवित आले......एकि वाट देईगांवासि जाए : एकि वाट डोमे ग्रामासि जाये । इत्यादि उत्तरार्धाच्या १५४ व्या लीळेंत 'कुसुमेश्वराचा' उल्लेख येतो. 'कुसुमेश्वरीं' राहूनि मग पुढां पाठविणें : गोसावी यासि कुसुमेश्वरी आसना बाईसीं (नागांबा) चरण क्षालन केलें : वीडा बोळगवीला : मग सर्वज्ञे (चक्रधरांनीं) भणीतलें : मार्कंडेया तुम्हीं बडुवे यांचेया घरा जा : कुचि टाळें (किल्ली कुलुप) मागा : मठु (मठ) उघडा : मठु चोखट करा : 'नाथोबा' यांनीं सांगितल्याप्रमाणें केल्यावर

चक्रधर तिकडे गेले. त्यानंतर "पुरादित्याच्या" देवळांत गेले : पूर्वामुख मठीं पुरादित्यांचा देऊळीं अवस्थान : दक्षिणीली भींतीसि पूर्व पश्चिम वोटा : नावेक ( थोडीशी ) पाकुळीयाची घाणी होती : सर्वज्ञें भणीतलें : तुपभाताचा धुप दाखवावा : धुप दाखविला: मग घाणि गेली : ।

लीळा १७२ मधें "म्हाळशी भवनी बडुवा पूजा" यासंबंधीं माहिती आहे. १८२ लीळेमध्यें "साधाते म्हाळसी पाहो धाडणें" हा प्रसंग वर्णिला आहे. ( तो महत्त्वाचा वाटल्यावरून पूर्णपणें देत आहे. )

एकू दी उदयाचा पूजावस्त्रर जालेया नंतरे : गोसावी म्हाळसीचेया देऊळा बीजे केलें ( गमन केलें ). मग गोपाळाचेया देऊळीं रीगतां : उतरिलीकडे आसन: गोसावियाचेया दर्शना साधे ( एक शिष्यीण ) आली असेतिः तींये गोसाविया जवाळि बैसलि असेतिः सर्वज्ञे भणीतले : साधे हो : तुम्ही म्हाळसी देखिली : नाहीं जी : (साधानें उत्तर दिलें: नाहीं.) तरि : पाहाजा : (तर मग पहाजा ): होकांजी (बरें होय तर) : गेली तवं ती-एचे अळंकार फेडिले असति ( देवतेला स्नान घालण्या-साठीं अंगावरचें सर्व काढलेलें होतें. ) न्हाण करावेया: ऐसी देखिली : आणि आली : गोसावी पूसिले : साधे हो : म्हाळसी देखिली : जी जी : देखिली : कैसी आहे :

आहे काळी : मीटकी : सर्वज्ञें भणीतलें : तुमते कोण्ही पुसैल : तेयापूढें काइ ऐसी सांघाल : एकु वेळ पहा जा : हो कां : भणौनि : मागुति गेलि : तवं श्रृंगारू केला असे : ऐसी देखिली : मग आलीं : मागुते गोसावी पूसिलें : साधें हो : म्हाळसी देखिली : जी जी : देखिली : कैसी असें : पाटाऊं साउला ( रेशमी लांब रुंद वस्त्र ) नेसली असें : पाटाउं चोळी : कांकणें : कळावियाः सोनयांची तानवडे : भंवरिया भांगु : टीळा : नाकीं मोतीं : जी जी ऐसी देखिली जी : सर्वज्ञें म्हणीतलें : आतां होए : ॥ १८२ ॥

याप्रमाणें म्हाळसा ( श्रीमोहिनीराजाचें वर्णन ) आजही पूर्णपणें जुळतें. वरील प्रसंगाविषयीं रत्नमाळास्तोत्रांत पुढील उल्लेख आहे; " एकदा जगदीश तं साध्वी नारी समागता । प्रणम्य तत्र तिष्ठन्ती तामुवाच जगत्पतिः ॥ ५९८ ॥ गच्छ त्वं साध्वि सदनं विलोकितुं महाळसां ॥ ५९९ ॥ वस्त्रालंकार हीनां तां दृष्ट्वा शिघ्रं समागता ॥ २ ॥ देवः पप्रच्छ तां साध्वि त्वया दृष्ट्वा महाळसा ॥ ६०० ॥ दृष्टा सर्वज्ञ कृष्णाऽस्ति कृष्णांगी वटिरूपिणी ॥ निशम्योचे परेशस्तां कोऽपि त्वां पृच्छयिष्यति ॥ ६०१ ॥ वदिष्यसीत्थं तस्याग्रे नैवं पुनर्विलोकय । इत्युक्त्वासा पुनर्गत्वाऽऽलोक यन्ती महाळसां ॥ ३ ॥ वस्त्रालंकारसंयुक्तां दृष्ट्वा

देवीं समागता। शशंस वृष्टं देवेशमिदानीं साध्वि तदमवेत् ॥ ६०३ ॥

सारांश ‘ निधिवास ’ हें नांव, त्याच्या भोंवतालचीं गांवें कणेरेश्वर, कुसुमेश्वर, गोपाळपुरादित्य, संगमेश्वर, इ. देवळें त्यांचें मुख कोणत्या दिशेकडे आहे याचा कांहीं देवळांचे बाबतींत निर्देश, प्रसिद्ध म्हाळसेचें देऊळ व प्रतिमेचें वर्णन, कुसुमेश्वराचा घाट, नदीची थडी, इ. स्थळें उल्लेखिलेलीं सांपडतात. लीळाचरित्र, रत्नमाळास्तोत्र, स्थानपोथी, इ. मध्यें नेवास्याचें जें वर्णन आहे, त्यावरून ह्या देवस्थानचें पुराणत्व सिद्ध होतें.

— ३ —

## नवें मंदीर

औरंगजेबाचे मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्यें दिल्लीच्या तक्ताबद्दल वाद उत्पन्न झाला व ते सर्वजण दक्षिणचा उद्योग सोडून दिल्लीस परत गेले ( सन १७०७ ). संभाजी महाराजांचे वधानंतर त्यांचीं मुलें, माणसें औरंगजेबाचे कैदेंत होती; त्यावेळीं औरंगजेबानें संभाजीचा मुलगा शिवाजी ऊर्फ शाहू याचें लग्न करून दिलें; त्यावेळीं त्यानें हा भाग शाहूला लग्नांत आंदण

म्हणून दिला व कैदेंतून सुटून आल्यावर शाहूनें प्रथम आपला अंमल ह्या भागावर सुरूं केला. अशा रीतीनें हा भाग पुन्हां मराठ्यांच्या अंमलाखालीं आला. शाहूचे कारकीर्दींत पेशवे सर्व सत्ताधीश बनले. या पेशव्यांतील दुसरा पेशवा पहिला बाजीराव यांचे कारकीर्दींत बरेच सरदार उदयास आले. त्यांपैकीं शिंदे व होळकर हे दोन सरदार या भागांतील मूळचे रहिवाशी होते; त्यांचे ताब्यांत हा भाग सन १७५९ पासून १८०० पर्यंत होता व त्यांचेकडून सन १८०० मध्यें इंग्रजांनीं घेतला.

यांपैकीं होळकरांचे सरदार चंद्रचूड यांना नेवासें बु॥ हा गांव जहागीर देण्यांत आला. इ. स. १७६१ चे पानपतचे युद्धांत मराठ्यांचा पराभव झाला व कांहीं काळपर्यंत त्यांचा उत्तरेकडील उद्योग बंद पडला. पुढें थोरले माधवराव पेशवे यांनीं दक्षिणेंतील आपली घडी नीट बसवून उत्तरेकडे आपला दरारा बसविण्यास पुन्हां सुरुवात केली. ही कामगिरी रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा यांचेकडे सोंपविली होती व त्यांनीं सन १७६५ पासून उत्तरेंत स्वाऱ्या करून आपला जम बसविला; परंतु राघोबांच्या स्वाऱ्या म्हणजे नुसत्या भराऱ्या असत, त्यानें दरारा वाढे पण वसूल मुळींच नीट होत नसे व त्यामुळें त्यांना पैशाची नेहमीं तूट

पडे. अशा रीतीनें राघोबांची स्वारी एकदां माळव्यांत असतांना त्यांना पैशाची जरूरी पडली. त्यावेळीं होळकरांच्या गादीवर अहिल्याबाई (मल्हाररावांची सून—खंडेरावाची पत्नी) होती. तिच्या खजिन्यांत सोळा कोट रुपये शिल्लक होते. ही गोष्ट पेशव्यांना समजली. तेव्हां "आम्हांला लष्कराचे खर्चासाठीं पैशाची जरूरी आहे, तरी तुम्ही आम्हांस द्रव्य पुरवावें" असा पेशव्यांनीं बाईस निरोप पाठविला.

त्यावेळीं गंगाधर यशवंत चंद्रचूड हे बाईचे दिवाण होते. ते मल्हाररावांचे वेळेपासून गादीची सेवा करीत होते. त्यांनीं बाईस असा सल्ला दिला कीं, पेशवे हे आपले मालक आहेत. त्यांना संकटकाळीं मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे. परंतु बाईला तो सल्ला पटला नाहीं व तिनें चंद्रचूडावर फितुरीचा आरोप ठेवून कामावरून दूर केलें व त्याची मालमत्ता जप्त केली, व पेशव्यास असा निरोप पाठविला कीं, "नियमाप्रमाणें मी चालू सालची खंडणी भरली आहे; मजजवळ शिल्लक असलेला पैसा हा माझा खाजगी स्वरूपाचा असून तो मीं दान-धर्मांत खर्च करण्याकरितां ठेवला आहे. आपण ब्राह्मण आहांत तरी दक्षिणा म्हणून पैसा घेत असल्यास मी आपणांस देतें." या उद्दाम उत्तरामुळें पेशव्यास राग आला व त्यांनीं

लढाई करून पैसे घेण्याचें ठरविलें. परंतु पेशवे-होळकरांचा समेट होऊन तंटा मिटला.

दिवाणगिरी गेल्यावर सरदार चंद्रचूड हे बराच कालपर्यंत अज्ञातवासांत होते. त्याकाळांत त्यांचें वास्तव्य नेवासें येथें होतें. त्यावेळीं त्यांनीं नेवासें येथील देवता श्रीमोहनीराजास जहागीर व दिवाणगिरी परत मिळण्याबद्दल नवस केला व जर इच्छित मनकामना पूर्ण झाल्या तर श्रीचें मंदीर बांधून देण्याचें कबूल केलें. पुढें पेशवे व होळकरांचा समेट होऊन चंद्रचूडांना त्यांची दिवाणगीरी व जहागिर पेशव्यांनीं परत मिळवून दिली. परंतु यानंतर सरदार गंगाधरपंत चंद्रचूड हे पेशवे दरबारांत राहिले व त्यांचे चिरंजीव होळकर-दरबारचे दिवाण झाले. अशा रीतीनें मनेच्छा पूर्ण झाल्यामुळें चंद्रचूडांनीं कबूल केल्याप्रमाणें देऊळ बांधून देण्याचें ठरविलें. परंतु नवें देऊळ बांधावें किंवा जुन्याचाच जीर्णोद्धार करावा असा प्रश्न उपस्थित झाला. कारण जुन्या देवालयाजवळ मशीद बांधली गेली. त्या भागांत मुसलमानवस्ती झाली व देवालयाचे एका बाजूनें नदीचा प्रवाह जोरानें वाहूं लागला. त्यामुळें त्या मंदिरास धोका उत्पन्न झाला. असा प्रश्न उपस्थित झाला असतां सरदार चंद्रचूडांना दृष्टान्त झाला कीं, जुन्या मंदिरांतील मूर्ती एका गाडग्यांत

घालून त्याचे बैल यदृच्छया जिकडे जातील तिकडे जाऊं द्यावे व जेथें गाडयाचें चाक मोडून गाडा अडेल तेथें नवें मंदिर उभारावें. त्याप्रमाणें करण्यांत आलें व हल्लींचें मंदिर असलेल्या जागीं गाडा अडला व तेथें मंदीर उभारण्यांत आलें. ( अंदाजें इ. स. १७७३ )

ह्या देवालयाची बांधणी सुंदर असून त्याचें काम सुमारें ४।५ वर्षें चालून त्यास ४।५ लाख रु. खर्च आला. त्याचा पाया जमिनींत पाण्यापर्यंत खोल असून जमिनीचे वर ५० ते ७५ फूट उंचीचें मुख्य शिखर आहे; देवालयाचे दोन भाग असून एकांत आंतील बाजूस गाभाऱ्यांत उंच सिंहासनावर देवाच्या मूर्ती पश्चिमाभिमुख आहेत. देवाच्या मूर्ती वाळूच्या आहेत. एक मोहिनीराजाची,-अर्धनारीनटेश्वर, शंख, चक्र, गदा, अमृतकुपीधारी उभी मूर्ती ४॥ फूट उंचीची आहे. तिचे पायांखालीं राहू आहे. शेजारीं लक्ष्मीची सिंहावर बसलेली बैठी मूर्ती आहे. बाहेरचा भाग सभामंडपासारखा पुराणास उपयोगांत आणला जातो. हा सभामंडप अष्टकोनी असून त्याचा घुमट गोल आहे. घुमटाचा व्यास २५ फूट आहे. मध्यें खांब मुळींच नसून आंतून सुंदर नक्षीकाम केलेलें आहे. सभामंडपांत गणपती, सरस्वती, शंकरपार्वती, शनी, मारुती, नाग इत्यादि मूर्ती आहेत. देवालयास दोन दरवाजे आहेत.

मुख्य दरवाजा उत्तराभिमुख असून, त्यांत उभें राहिलें असतां ध्रुवदर्शन साधलें आहे.

---

— ४ —

## देवस्थानची व्यवस्था

देवालयाची व्यवस्था सर्वस्वीं बडवेच पाहतात. जुन्या देवालयाचे काळापासून देवस्थानची मालकी व व्यवस्था बडवे यांचेकडेच आहे. देवाचा रोजचा कार्यक्रम–काकडआरती, अभिषेक, पूजा, पाद्यपूजा, पोथी-पुराण, धूपारती, शेजारती एवढा सर्व कार्यक्रम सकाळीं सुमारें सहापासून रात्रौ दहा वाजेपर्यंत चालतो. हा सर्व कार्यक्रम करणें, त्याचा सर्व खर्च करणें हें सर्व बडवेच करतात. ग्रामस्थ रोज दर्शनास येतात त्यावेळीं धान्य, पैसे इत्यादि रूपानें देवापुढें जें कांहीं ठेवतात त्यावर बडवे आपली उपजीविका चालवितात. पुरातनकालीं २।३ इनाम मिळालेले आहेत. नंदादीपाकरितां म्हणून हल्लीं सरकारी खजिन्यांतून वार्षिक रु. ७२ फक्त बडवे यास मिळतात. हें दैवत बरेच लोकांचे कुलस्वामी अथवा उपास्य दैवत असल्यामुळें दूरदूरचे लोक येथें येऊन आपले कुलधर्म, कुलाचार करतात; चौल (जावळ), उपनयन (मौंज), विवाह, ओहर

इत्यादि विधि-संस्कार येथें होतात. त्या वेळीं दान-धर्माच्या रूपानें व दक्षिणेच्या रूपानें देवस्थानास उत्पन्न मिळतें.

देवाच्या पूजेच्या पाळ्या वांटून घेतल्या आहेत. सुमारें ३०।४० पिढ्यांपासून बडवे यांचीं तीन घरें आहेत. प्रत्येक जण चैत्र शु॥ १ पासून फाल्गुन व॥ ३० पर्यंत आपली पाळी करतो. ज्याची पाळी असेल तो सर्व व्यवस्था ठेवतो व उत्पन्न घेतो. येथें चोप-ड्यांची किंवा पंड्यांची पद्धति नाहीं. त्यामुळें येणारा-जाणारास त्रास होत नाहीं. एकाची पाळी असतांना दुसरा त्यांत ढवळाढवळ करीत नाहीं; त्यामुळें सर्व क्रम सुरळीत चालतो. बडवे यांच्या मूळ तीन घरांची खाजगी वांटणीमुळें हल्लीं ५।६ घरें झालीं आहेत; परंतु पूर्वींची वहिवाट तशीच चालू आहे.

देवाची यात्रा माघ महिन्यांत भरत असते. माघ शु॥ ८ पासून शु॥ १४ पर्यंत भागवत–सप्ताह होत असतो; व १५ स कुलधर्म व गोंधळ होतो. माघ व॥ १ ला महापूजा होऊन देवाची भोगमूर्ती (उत्सवा-करितां पंचधातूंची केलेली आहे ती) पालखींत घालून मिरवत मिरवत नदीकांठीं पाकशाळा आहे तेथें नेण्यांत येते. तेथें पांच दिवस मूर्ती ठेवतात व त्या ठिकाणीं पांच दिवसपर्यंत सर्व हिंदूंना अन्नरूपानें प्रसाद

मिळतो. पांचवे दिवशीं म्हणजे माघ व॥ ५ स देव परत पालखींतून मिरवत मिरवत मुख्य देवालयांत आणतात व काला वांटण्यांत येतो. त्याच दिवशीं रात्रीं पुन्हां १२ वाजतां गांवांतून छबिना निघतो व लोक देवास ओवाळून कानगी करतात. सर्व गांवांतून देव मिरविल्यावर ज्ञानेश्वर-मंदिराजवळ नेण्यांत येतात व तेथून परत पाकशाळेजवळील घाटावर पालखी येते. तेथें पहांटेच्या वेळीं प्रेक्षणीय असें दारू-काम होतें व त्यानंतर देव परत देवळांत येऊन उत्सव समाप्त होतो. उत्सवाकरतां मुख्य मंदिरापुढें मोठा मंडप उभारण्यांत येतो व तेथें दुपारीं गायन व रात्रौ कीर्तन असा कार्यक्रम पांच दिवस होतो. अशा रीतीनें उत्सव होतो. त्याकरतां आसपासचे व दूरदूरचे असे सुमारें ५।६ हजार लोक येतात.

सदर उत्सवासाठीं पेशव्यांचे काळापासून सन १८६० पर्यंत सुमारें १५०० रु. सरकारांतून मिळत असत. परंतु १८६१ मध्यें इंग्रज सरकारनें इनाम कॉमिशन नेमलें; त्यानें ती देणगी बंद केली व हल्लीं फक्त २४८ रु. मिळतात. उत्सवाची व्यवस्था पाहण्या-करितां गांवांतील सभ्य व वजनदार असे गृहस्थ पंच नेमले आहेत. ते सदरची सरकारी रक्कम घेतात. कांहीं (२।३) जमिनी आहेत. त्यांचें उत्पन्न येतें. त्यांतून

यात्रेचा खर्च करण्यांत येतो; परंतु येवढ्या थोड्या पैशांत इतका मोठा खर्च परवडत नाहीं. म्हणून गांवांत ऐपतीप्रमाणें वर्गणी करण्यांत येते. श्रीमंत व भाविक लोक नवसाच्या पंक्ति देतात व त्यामुळें उत्सव यथासांग पार पडतो.

## उपासना

ज्यांचें हें कुलदैवत आहे त्यांनीं श्रीची उपासना पुढीलप्रमाणें करावी. रविवार हा श्रीचा वार आहे. त्या दिवशीं उपवास करावा व रात्रीं भोजन करावें, पूजा–आरती करावी. दरसाल माघ शु॥ ८ पासून १५ पर्यंत नवरात्र बसवून दिवा लावावा. पौर्णिमेस कुलधर्म करून ब्राह्मण–सुवासिनी घालून उपवास सोडावे. पौष शु॥ १५ पासून माघ शु॥ १५ पर्यंत धरणेंपारणें करतात, म्हणजे एक दिवस उपास (एकादशीप्रमाणें) व एक दिवस भोजन करतात. येणेंप्रमाणें उपासना आहे.

---

— ५ —

# परिशिष्टें

**सरदार चंद्रचूड**—हल्लींचें मंदीर बांधणारे गंगाधर यशवंत चंद्रचूड ऊर्फ गोसावी हे मूळचे पुणें जिल्ह्यांतील

खेड तालुक्यांतील निंबगांव ( धावडी ) येथील राहा-
णारे. बाजी यशवंत व गंगाधर यशवंत हे दोघे भाऊ.
पैकीं गंगाधर ऊर्फ गंगोबा तात्या हे धाकटे होत.
पेशव्यांचे काळांत शूर व कर्तबगार पुरुषांचे कर्तब-
गारीस वाव मिळत असल्यामुळें प्रत्येकास आपले
अंगची कर्तबगारी दाखवून पुढें येतां येत असे.
त्याप्रमाणें गंगाधर यशवंत हे खेडथांत जन्म पावून
स्वतःचे कर्तबगारीच्या जोरावर मल्हारराव होळकर
यांचे दरबारीं दिवाण बनले. मल्हाररावांचे पश्चात्
पुरुष वारस नसल्यामुळें अहिल्याबाईसारखी विधवा
गादीवर बसवून पानपतच्या युद्धानंतरच्या पडत्या
काळांतही मोठ्या जोरानें मराठेशाहीचा ढासळतां
बुरूज त्यांनीं सांवरून धरला. परंतु मध्यंतरीं देवी
अहिल्याबाईची पेशवे-प्रकरणांत त्यांचेवर खप्पा मर्जी
झाल्यामुळें त्यांना कांहीं काळ अज्ञातवासांत काढावा
लागला. परंतु पेशवे-होळकर समेट झाल्यावर पेशव्यांचे
मध्यस्थीनें व ईश्वरकृपेनें त्यांचें दिवाणपद व जहागीर
त्यांना परत मिळाली. परंतु म्हातारा मानी असल्यामुळें
त्यानें स्वतः होळकरांचें दिवाणपद आपल्या मुलाकडे
देऊन आपण पेशवे-दरबारांत राहिला. परंतु त्यांच्या
तामसी स्वभावानें त्यांचें तेथेंही जमलें नाहीं. भरदर-
बारांत त्यांचा श्रीमंत पेशवे सरकारशीं खटका उडाला

व त्यांनीं राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें. होळकराकडून चंद्रचूडांना नेवासें तालुक्यांतील २२ गांवें जहागीर मिळालीं होतीं. परंतु पेशवे दरबारांत खटका उडाल्यावर यांतील कांहीं गांवें कमी झालीं. इंग्रजांचे कालापर्यंत त्यांचे वंशजाकडे नेवासें बु॥, व्याहामोडवे, दहीगांव, रांजणी, धावडी, निंबगांव इत्यादि ७।८ गांवेंच चालू राहिलीं. परंतु आज मितीस नेवासें बु॥ गोंदी पाथरवाले खेरीज कोणतेंच गांव त्यांचे वंशजाकडे नाहीं. सरदार गंगाधर यशवंत यांनीं आपले हयातींत बरींच देवळें नवीन बांधलीं. कांहींचा जीर्णोद्धार केला. नेवासें बु॥ येथें त्यांचे वंशज आजही आहेत. त्यांचे पासून सुमारें दहावी पिढी आज येथें आहे.

**देवस्थानच्या नक्त नेमणुका**—सदर देवस्थानास पेशवे काळीं १५०० रु.ची नक्त नेमणूक होती. परंतु इ.स. १८६१ मध्यें ब्रिटिश सरकारनें इनाम कमिशन नेमलें होतें. त्यानें ती देणगी बंद केली व हल्लीं फक्त ३२० रु. मिळतात. त्यांची वाटणी-वहिवाट पुढील प्रमाणें आहे. पुजारी बडवे यांस नंदादीपाबद्दल ७२ रु. व उत्सवा-करितां पंचास रु. २४८. या २४८ ची देणगी खालील प्रमाणें आहे. नेवासें तालुक्यांत फाळणी करून १७१ गांवें ठरलीं; त्यांपैकीं १५० खालसा व २१ दुमाला. या खालसा गांवचे वसुलांतून १५० रु. व दुमाला

गांवाचे ९६ रु. मिळतात. दुमाला गांवांचीं नांवें व गांववार रकमाः—[ नेवासें बु॥ २५ रु., जळके खु॥ ३ रु., घोगरगांव ३ रु., मंगळापूर २ रु., खामगांव ४ रु., तुळजापूर २ रु., काळेगांव ३ रु., करजगांव ४ रु., प्रवरासंगम ३ रु., घोडेगांव ५ रु., खेडेले परमानंद ५ रु., माळेवाडी दुमाला १ रु., बकुपिंपळगांव ५ रु., देवगांव ४ रु., गोपाळपूर २ रु., नजिकचिंचोली २ रु., माके ९ रु., राघूहिवरे २ रु., दहिगांव ५ रु., रांजणी ५ रु., देवटाकळी २ रु., नजिकबाभुळगांव २ रु.,=९८ रु. एकूण ] याप्रमाणें सरकारी खजिन्यांतून रकमा मिळतात. याशिवाय ४२ रु. सरदार चंद्रचूड यांचे कडून वार्षिक नंदादीपाप्रीत्यर्थ, १२ रु. राजे भोर संस्थान (पंतसचीव) यांचेकडून वार्षिक नंदादीपास मिळत असत; परंतु चंद्रचूडांची परिस्थिती खालावल्यामुळें व भोरकरांचे औदासिन्यामुळें सदर रकमा मिळत नाहींत. त्या बदत्रे यांस मिळत असत. या शिवाय पंचांचे ताब्यांत कांहीं जमिनी ( २।३ ) आहेत. त्यांचें उत्पन्न उत्सवास खर्च होतें. याशिवाय उस्थळ, दुमाला या गांवचे ५ रु. मिळत असत. परंतु तो गांव नगर येथील बारा इमाम या मुसलमानी देवळांस इनाम असल्यामुळें तंटे होऊ लागले, म्हणून पंचांनीं ती रक्कम १७५ रु. स विकली.

**देवस्थानची इस्टेट**—हल्लीं देवस्थानची इस्टेट पुढीलप्रमाणें आहे.

(अ) पंचाचे ताब्यांतील देवस्थानची इस्टेट—

स्थावर : (१) पाकशाळा–अजमासें किंमत रु. १०००. (२) ओकाचा वाडा–अजमासें किंमत रु. ५००. (३) दोन सर्व्हे नंबर (एक मौजे बकुपिंपळगांव ता. नेवासें येथें व दुसरा मौजे धामोरी ता. नेवासें येथें) अजमासें किंमत रु. ३०००. (४) लहान जागा (देवळाजवळ) अजमासें किंमत रु. २००.

जंगम : (१) तांब्या-पितळेचीं भांडीं अजमासें किं. रु. ५००. (२) चांदीचीं भांडीं व दागिने अजमासें किं. रु. १००. (३) मंडप–ताडपत्री, लाकूड व किरकोळ मिळून किंमत रु. २५०. (४) रोख रक्कम रुपये दीड हजार (१५००) कॅशसर्टिफिकेट्सच्या रूपानें नेवासें पोस्टांत.

येणेंप्रमाणें सुमारें सात हजार रुपयांची इस्टेट पंचांचे ताब्यांत आहे.

(ब) बडवे यांच्या ताब्यांतील इस्टेट—

देवाचे अंगांवर चांदीच्या पत्र्यांचीं आयुधें व चांदीचे दागिने आहेत व ते सतत देवाचे अंगावर असतात. ते सर्व मिळून सुमारें २५०-३०० भार चांदी आहे. त्यांची किंमत अजमासें २०० रु. होऊं शकेल.

येणेंप्रमाणें आजमितीस देवस्थानची इस्टेट आहे.

**ज्ञानोबाचा खांब**—नेवासें गांवच्या पश्चिमेस सुमारें पाव मैल अंतरावर लाडमोड या गांवच्या



हद्दींत करवीरेश्वर महादेवाचें देऊळ आहे. त्या देवालयाचे जवळ एक ४½ फूट उंचीचा दगडी खांब आहे. मराठी भाषेचे आद्यप्रवर्तक श्रीज्ञानेश्वर महाराज हे फिरत फिरत येथें आले होते व त्यांनीं करवीरेश्वराचे देवळांत मुक्काम केला व वर उल्लेखिलेल्या खांबाला टेकून बसून त्यांनीं आपला प्रसिद्ध ग्रंथ " भावार्थदीपिका " (ऊर्फ ज्ञानेश्वरी) लिहविला. (शके १२१२) हा ग्रंथ म्हणजे भगवत गीतेवरील मराठी टीका आहे. यांत अध्यात्माला

विशेष महत्त्व दिलेलें आहे. गीता मूळ ७०० श्लोकी त्यांवर ज्ञानेश्वरानें ९०३७ श्लोक (ओंव्या) टीका केली आहे. त्या ग्रंथाचे लेखकही आजचे नेवासें बु॥ येथील कुलकर्णी सच्चिदानंद हे होते. (शके बाराशें बारोत्तरे। तै टीका केली ज्ञानेश्वरें ॥ सच्चिदानंद बाबा आदरे। लेखकु जाहला) हल्लीं करवीरेश्वराचें महत्त्व कमी होऊन सदर खांब स्मारक म्हणून प्रसिद्ध आहे. त्या खांबाचें देऊळ बांधून त्याची पूजाअर्चा करण्यांत येते. दरसाल फाल्गुन व॥ ११ ते १३ पर्यंत त्याची यात्रा भरते व काला होतो. तो खांब ज्ञानोबाचा खांब म्हणून प्रसिद्ध आहे. सदर यात्रेस बरेच संत येतात. त्यांत बेलापूरकर भागवतबुवा व भारतबुवा, अमळनेरकरबुवा, औरंगाबादकर, बाबूरावबुवा, गंगागीरबुवांचे शिष्य कोंडीकाका हे प्रमुख आहेत. त्या खांबावर एक अनुष्टुप् छंदांत सात ओळींचा श्लोक आहे. तो पुढीलप्रमाणें—

"ओनमः (कर) वीरेश्वराय। पितामहेन यत्पूर्वं (दत्तं)षङ्कं जगद्गुरोः। अखंड वर्ति तैलार्थ ...... प्रति मासं सदाहितव्। रूपकाणां षङ्कं संख्या देया आचंद्र सूर्यकं। (यःस्वी) करोति दुष्टः (सः) तस्य पूर्वे व्रजंत्यधः। मंगलं महाश्रीः। हा श्लोक म्हणजे वीरेश्वराचे देवालयास नंदादीपाच्या खर्चाकरतां

दिलेल्या वर्षासनाबद्दल शिलालेख आहे. सदरचें वर्षासन अद्यापही त्या देवालयास मिळत आहे.

या देवालयाचे मागें सुमारें १७ फूट अंतरावर देवालयाचे आवारांतच एक ओवरी आहे. तिचे मालकीहक्काबद्दल मध्यंतरीं सन १९१५ मध्यें हिंदुमुसलमानांत वाद उत्पन्न होऊन त्याचें पर्यवसान दंग्यामध्यें झालें व प्रकरण सरकारमध्यें गेलें. सरकारनें तंटयाच्या जागेचा कबजा स्वतः घेऊन तिचा मालकी हक्क योग्य मार्गानें जो समाज शाबीत करील त्याचे ताब्यांत ती जागा दिली जाईल, असा जाहीरनामा काढला. त्याप्रमाणें दिवाणी कोर्टांत सन १९२९ पासून १९३५ पर्यंत (तिन्ही कोर्टांत) दावा चालून शेवटीं त्याचा निकाल हिंदू समाजाचे बाजूनें लागून तिचा ताबा हिंदूंस मिळाला (१९३७). याप्रमाणें तंटा होण्याचें कारण म्हणजे सदर इमारतीची बांधणी अर्धवट म्हशिदीसारखी असून खांबावर हिंदूपद्धतीचीं चित्रें कोरलीं आहेत. शिवाय इमारतींत एक शिलालेख असून सदर इमारत महमूद यानें बांधली असून ती मशीद आहे असा त्यांत उल्लेख आहे. तो लेख अरबी लिपींत आहे. तंटयाचे वेळीं त्याचे ठसे घेऊन प्रो. वर्मा यांनीं त्याचा अर्थ केला.

**प्रवरासंगम टोकें**—प्रवरासंगम टोकें हीं गावें नगर-

औरंगाबाद रस्त्यावर नेवाश्यापासून नऊ मैलांवर आहेत. हीं गांवें प्रवरा व गोदावरी या नद्यांच्या पवित्र संगमावर वसलीं असल्यामुळें त्यांना क्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. महालयाक्षेत्राच्या पंचक्रोशींत हीं गांवें येतात. ह्या ठिकाणीं संगमावर अंत्येष्टीचे संस्कार होतात. टोकें येथील जुनीं देवळें १७६१ नंतर पानपतच्या युद्धाचा सूड म्हणून निजामानें फोडलीं. परंतु सन १७६७ मध्यें टोकें येथील सावकार विष्णू महादेव गद्रे यांनीं हल्लींचें प्रसिद्ध असलेलें श्रीसिद्धेश्वर महादेवाचें मंदीर बांधलें. त्याकरतां ९३००० रु. खर्च केला. सिद्धेश्वराची यात्रा दरसाल माघमासीं कृष्ण १४ स म्हणजे महाशिवरात्रीस भरते. रात्रीं मिरवणूक निघते व प्रेक्षणीय असें दारूकाम होतें. पूर्वीं ही यात्रा फार मोठी भरत असून दोन महिनेपर्यंत चालत असे. परंतु हल्लीं ती थोडक्या प्रमाणांत फक्त तीन दिवसच भरते. टोकें येथें पेशव्यांची पागा होती ती इमारत अद्याप आहे. त्यावेळीं नाना फडणिसांनीं स्नानसंध्ये-करतां गंगेस सुंदर घाट बांधले, ते अद्याप चांगल्या स्थितींत आहेत. कायगांव येथें काळेश्वर महादेवाचें स्थान आहे व प्रवरासंगम येथें गंगेचें देऊळ असून गंगेची मूर्ती मोठी प्रेक्षणीय आहे. सदर गांवें जोशी उपनांवाचे ब्राह्मणांचेकडे इनाम आहेत.

**नेवासें**—पूर्वीचे निधिनिवासचे पुढें निवास व निवासचें नेवासें असें रूप होऊन हल्लीं नेवासें हें नांव प्रचलित आहे. हा गांव हल्लीं नगरजिल्ह्यांतील तालुक्याचा गांव केला आहे. त्यामुळें येथें तालुक्यांतील सर्व (मामलेदार, फौजदार, रजिस्ट्रार) अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या आहेत. येथें दवाखाना, शाळा, इ. सर्व सोयी आहेत. हा गांव अहमदनगरपासून नगर-औरंगाबाद रोडच्या ३२ व्या मैलापासून आंत ३ मैल आहे. येथें येण्यास नगरहून मोटारी मिळतात. पुणें ते नगर व नगर ते नेवासें अशा मोटारनें प्रवास करतां येतो. दौंड-मनमाड रेल्वेच्या बेलापूर स्टेशनपासून हा गांव २१ मैल असून बेलापूर ते नेवासें मोटारी मिळतात. महाराष्ट्रसंत श्रीएकनाथ यांचें समाधीस्थान व महाराष्ट्रांतील जुनें राजधानीचें व विद्येचें केंद्र असलेलें असें प्रतिष्ठान ऊर्फ पैठण हें येथून ३५ मैल आहे. येथून मोटारनें शेवगांव २१ मैल व तेथून मोटारनें पैठण १४ मैल असा प्रवास करतां येतो. त्याचप्रमाणें प्रसिद्ध अशा लेण्यांपैकीं वेरुळचीं लेणीं व दौलताबादचा किल्ला येथून सुमारें ४० मैल आहे. तेथेंही येथून मोटारनें जातां येतें.

## वडवे यांच्या सनदा

या सनदा मूळ वडवे यांचे जवळ होत्या. त्या भा. इ. सं. मंडळ, पुणें यांनीं शके १८५४ मध्यें छापल्या. त्यांवरून त्यांच्या परवानगीनें त्या येथें देण्यांत येत आहेत.

ले. ७०० } [ फा. शि. { श. १५४० चैत्र शुद्ध ११
मू. दा. प. } व. म. ] { इ. १६१८ मार्च २६

मुतसदियानि व हुदेदारानि हाळ व इस्तकबाळ व मोकदमानी मौजे बेळपिपलगौ पाा नीवासे बिदानद सुाा समान असर व अलफ दादो माणको बडवा वसई मजकूर हुजूर माळूम केळे जे आपणास चावर येक गज सरायेनी इनाम दर सवाद मौजे माा वाा परवाना नवाब साहेब भोगवटा आहे. साल मजकुराकारणें ताजे परवानेयाचा उजूर करितातो माळूम जाळे दादो माणको बडवा यासी इनाम दर सवाद कसबे मजकूर गज सरायेनी बर हुकूम परवाना नबाब साहेब जैसे चाालिळे आहे तेणेप्रमाणें चालविजे दर हर साळ खुर्दखताचा उजुर न किजे तालीक घेऊन असली फिराउनू दीजे

तेरीख ९ माहे रबिलाखर सन १०२७

---

ले. ७०१ } [फा. शि. { श. १५४३ फाल्गुन शुद्ध १०
मू. दा. प. } व. म.] { इ. १६२२ फेब्रुवारी १०

मुतसदियानी महमात मौजे निबोडी बिदानद सुा इसने इसरीज अलफ शिवदासभट बिन कृस्णभट यासी इनाम जमीन चावर येक दो नख्तयाती ता देह कुलबाब कुलकानू ता इहदे तसरुफाती ········ वतन जैसे चालिले तैसे चालविजे चावर नीम ॥ दर हर साळ खुर्दखताचा उजूर न कीजे तालीक घेउनू असली फिराउनू दीजे

तेरीख ८ माहे रबिलाखर सन १०३१

[ पाठीवर २ फा. शि. व २ शेरे ]

ले. ७०२ } [ फा. ३ शि. व { श. १५४८ चैत्र व. ९
मू. दा. प. } मज पाठीवर २ शेरे] { इ. १६२६ एप्रिल १०

मुतसदियानि महमात पा नीवासे बिदानह तुा **सीत इसरीन** व अलफ इनामदार ना २ दरसवाद देहाये पा मजकूर चावर २ दादो माणको बडवा वसई मा बदळ नरसो पीलदेऊ व दादो माणको बडवा खैराती मौजे पिपलगौ पा मा चावर १ म्हाळसादेवी मौजे भोगळगौ १ भागवटा आहे. तसरुफाती ता खमस ········ वतन जैसे चालिळे आहे तैसे चालविजे दर हर साळ परवाने याचा उजूर न कीजे तालीक घेउनू असली फिराउनू दीजे चावर २

तेरीख २३ माहे रजब सन १०३५

---

[ ' बन्दह दर्गाह यगानी दियानत हुसेनखानी ' हा फा. शि.]

ले. ७०३ } { श. १५४८ माघ शुद्ध ५.
मू. दा. प. } { इ. १६२७ जानेवारी १२

अज दिवाण ठाणे पा निवासे ता मोकदमानी मौजे बेलपिंपळगौऊ पा मजकूर बिदानद सुा सबा इसरीनअल [ फ ] बा हुकमती रोख बर्जुमाल छ १७ रबिलाखर पौ छ २८ मिा सादर जाला तेथे रजा जे बा फर्मान बह सिके खास व खुाा मा मदारी मा अबर ता सन खमस जैसे इनामदार मजकुरास चालिले असेल तेणेंप्रमाणें साल मा दुमाला कीजे म्हणौनु रजा तरी दादो माणको बडवा सो नीवासे ठाणा येउनू माळूम केळे जे आपणासी इनाम दर सवाद मौजे मजकूर गज शरायेणी जमीन चावर येक ता सन खमस भोगवटा चालिला आहे. साल माकुरी ताजे खुर्द खताचा उजूर करिताती दरीबान खूर्दखत होय माळूम जाले तरी इनामदार मजकुरास इनसदर सनाद मौजे मा जमीन चावर गज शरायेणी चावर येक ता सन खमस भोगवटा तसरुफाती गहदम् चालिले असेल तेणें प्रों साल मा दुमाला कीजे तालीक घेऊनू असली फिराउनू दीजे [ नि ] मोर्तब [ फा ष. मो. ] तेरीख ५ माहे जमादिलावल जमादिलौ वलु.